जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 OCT 2024
लोकमत

# 'सीएचबी' प्राध्यापकांची दिवाळी आज होणार गोड

## खात्यात मानधन जमा होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : कोल्हापूर विभागातील ९२ हून अधिक महाविद्यालयांतील १३८१ तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या (सीएचबी) खात्यात दिवाळीपूर्वीच म्हणजे आज, सोमवारी (दि. २८ ऑक्टोबर) ७ कोटी १४ लाख ३६ हजार रुपये मानधन जमा होणार असल्याने त्यांची दिवाळी गोड होणार आहे.

कोल्हापूर विभागांतर्गत शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांचा समावेश आहे. बहुसंख्य महाविद्यालयांतील सहायक प्राध्यापकांची पदे रिक्त असून ती अद्याप भरलेली नाहीत. ४० टक्के प्राध्यापक पदभरतीची प्रक्रिया आचारसंहितेत अडकली आहे. महाविद्यालयात विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून 'सीएचबी' प्राध्यापकांची भरती केली आहे. या वर्षापासून मानधनात वाढ झाली असली तरी तास, तासिका घोळ अद्यापही कायम आहे. त्यामुळे काही प्राध्यापकांना जुन्या पद्धतीने मानधन मिळाले आहे.

तासिका तत्त्वावरील सहायक प्राध्यापकांची मानधन बिले सादर करण्याच्या सूचना विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक यांनी दिल्या आहेत. त्यानुसार महाविद्यालयांनी प्रस्ताव पाठविले आहेत. कोषागार कार्यालयाने सुमारे सात कोटी रुपये मंजूर करून महाविद्यालयांना पाठविले आहेत; त्यामुळे या प्राध्यापकांच्या खात्यात ही रक्कम आज, सोमवारी जमा होईल.